महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१२
नामनिर्देशनपत्रांच्या छाननीबाबत..

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ/ मनपा/२०१०/प्र.क्र. १८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ०१/०२/२०१२

# आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ / मनपा / २०१० / प्र.क्र.१८ / का.५, दि. ३ जानेवारी, २०१२ अन्वये बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक व औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाड या महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकांकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून त्यानुसार आज दि. १ फेब्रुवारी, २०१२ रोजी नामनिर्देशनपत्राची छाननी होणार आहे.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्र. ८५३/२०१२ मध्ये न्यायालयाने दि. ३१ जानेवारी, २०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी

उमेदवारांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबतची जी जातीची वैधता प्रमाणपत्रे सन २००० च्या अधिनियमानुसार आणि माधुरी पाटील प्रकरणी विहित करुन दिलेल्या निकषानुसार दक्षता समितीचा अहवाल घेऊन देण्यात आलेली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना यासंदर्भात संपूर्ण माहिती घेण्याकरिता अशा सर्व नामनिर्देशनपत्रांची माहिती गोळा करुन त्यानंतर निर्णय घेण्याकरिता पुरेसा कालावधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने एका दिवसाने नामनिर्देशनपत्राची छाननी पुढे ढकलणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक व औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाड या महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकांमध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१२ रोजी होणारी छाननी करतांना ज्या राखीव पदांबाबत **न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयानुसार अधिक माहिती घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे, अशा नामनिर्देशनपत्रांची छाननी एका दिवसाने पुढे ढकलण्यात यावी. सदर छाननी दि. २ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी ११.०० वा. सुरु होईल. मात्र उर्वरित जागांवरील नामनिर्देशनपत्राची छाननी दि. १ फेब्रुवारी, २०१२ रोजी सुरु करावी.** संबंधित महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तशी सूचना जाहीर करुन ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर व औरंगाबाद महानगरपालिका.

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

सर्व संबंधित जिल्हाधिकारी.